# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

### प्रसिद्धीपत्रक

- **मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खड्डे बुजविण्याच्या कामाला गती; युद्धपातळीवर कार्यवाही सुरू**

मिरा भाईंदर शहरात पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या खड्ड्यांमुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासावर तातडीने उपाययोजना करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने युद्धपातळीवर पावले उचलली आहेत. मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिलेल्या स्पष्ट निर्देशानंतर खड्डे बुजवण्याचे काम प्राधान्याने सुरू करण्यात आले आहे.

मिरा भाईंदर शहरातील रस्ते देखभाल व दुरुस्तीचे अधिकार विविध संस्था व विभागांकडे विभागले गेले आहेत. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे फाऊंटन हॉटेल ते दहिसर चेक नाका दरम्यानचा रस्ता, तर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) विभागाकडे दहिसर चेक नाका ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा आणि पुढे गोल्डन नेस्ट ते सुभाषचंद्र बोस मैदानदरम्यानच्या रस्त्यांची जबाबदारी आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे गायमुख ते फाऊंटन आणि संपूर्ण शहरातील अंतर्गत रस्त्यांची देखभाल दुरूस्तीची जबाबदारी देण्यात आली आहे.

शहरात सुरू असलेल्या विविध पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांमुळे काही ठिकाणी रस्त्यांचे खोदकाम सुरू असून, त्यामध्ये १२३ कि.मी. व्यासाच्या वाढीव पाणीपुरवठा पाइपलाइन प्रकल्पाचा समावेश आहे. त्याचबरोबर ३ कि.मी. लांबीची मलवाहिनी लाईनच्या कामामुळे देखील काही भागात रस्त्यांचे खोदकाम करण्यात आले आहे. यामुळे काही ठिकाणी खड्डे निर्माण झाले असून, हे खड्डे बुजवण्याचे काम जलदगतीने सुरू आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) मार्फत शहरात ३७ सिमेंट कॉंक्रिट रस्त्यांचे काम सुरू असून, महापालिकेच्या मार्फत १५ सिमेंट कॉंक्रिट रस्त्यांची कामे देखील प्रगतीपथावर आहेत. याच अनुषंगाने महापालिकेने मागील चार दिवसांत एकूण ६२७ खड्डे खडीकरण, डांबरीकरणाद्वारे बुजविण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) ने दहिसर चेक नाका ते सुभाषचंद्र बोस परिसरात ७६ खड्डे खडीकरण, डांबरीकरणाद्वारे बुजविण्यात आलेले असून, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत आतापर्यंत १५० खड्डे खडीकरण, डांबरीकरणाद्वारे बुजविण्यात आलेले आहेत. मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रात खड्डे बुजवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून नागरिकांना सुरक्षित, खड्डेमुक्त प्रवासाचा अनुभव देण्यासाठी सर्व विभाग समन्वयाने कार्यरत असून नागरिकांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.